ePaper
**उदयनराजेंविरुध्द शशिकांत शिंदे प्रतिष्ठेच्या लढतीचा कौल सीलबंद!**



|| वर्ष - 7 । अंक - 317 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- सॅमसनला बाद देण्याचा निर्णय वादग्रस्त
- आलियाभट्टचा देसी अंदाज!
- भाजपा लोकांच्या जिवाशी खेळ करते
- 11 राज्यांमध्ये 93 जागांसाठी मतदान

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 8 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## सुप्रिया सुळे यांची ‘इमोशनल डिप्लोमसी’

# बारामतीसह महाराष्ट्र ‘कन्फ्युज’

### » राजकीय विश्लेषकांचा अंदाज: महाविकास आघाडीला होणार फायदा

। पुणे । महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात राज्यातील 11 लोकसभा मतदारसंघात मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली. त्यातच बारामतीच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे मतदानानंतर थेट अजित पवार यांच्या काटेवाडी येथील घरी पोहोचल्या. या भेटीत आपण केवळ आपल्या काकू म्हणजे अजित पवारांच्या मातोश्रींचे आशीर्वाद घेतल्याचा दावा केला. पण त्यांची ही भेट राजकीय दृष्टिकोनातून मास्टरस्ट्रोक ठरण्याची शक्यता आहे. कारण राजकीय विश्लेषकांनी या भेटीमुळे सुप्रिया सुळेंना प्रत्यक्ष मतदानात लाभ होईल असा दावा केला आहे.**






तिसऱ्या टप्प्यात सर्वात मोठा ट्विस्ट बारामतीत पाहायला मिळाला आहे. कारण बारामती लोकसभा मतदारसंघाच्या शरद पवार गटाच्या उमेदवार सुप्रिया सुळे या अजित पवार यांच्या काटेवाडी इथल्या घरी दाखल झाल्या. अजित पवार आणि त्यांची आई काटेवाडीत आहेत, त्यांच्या भेटीसाठी सुप्रिया सुळे एकट्याच काटेवाडीत पोहोचल्या. या भेटीमुळे बारामतीच्या राजकारणात मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला. सुप्रिया सुळे यांनी मतदान केलं आहे. बारामतीत सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार यांच्यात लढत होत आहे.

### सुप्रिया सुळेंच्या भेटीमागे दडलंय काय?

अजित पवारांच्या भेटीची चर्चा आता राज्याच्या नाही तर देशात राजकारणात होणार आहे. सुप्रिया सुळेंच्या भेटीचा मतदानावर परिणाम होण्याची शक्यता आहे. प्रचारादरम्यान एकमेकांवरा आरोप प्रत्यारोप करण्यात आले. ऐकमेकांवर विखारी टीका करण्यात आली.

निवडणुकीत प्रचाराच्या वेळी पवार वि. पवार अशी लढाई दाखवण्यात आली मात्र हे कुटुंब एकच आहे. पवार कुटुंबात कोणतेच वितुष्ट नाही, हे एकत्रच राहणार असेल तर आपण कार्यकर्ते म्हणून या लढाईत सहभागी व्हायचे का? असा मेसेज कार्यकर्त्यांमध्ये तसेच मतदारांमध्ये जाण्याची शक्यता आहे.

### भेटीनंतर सुप्रिया सुळे काय म्हणाल्या?

सुप्रिया सुळेंनी अजित पवारांच्या काटेवाडीमधील घरी जाऊन अजित पवारांच्या आई आशा पवार यांची भेट घेतली. यावेळी घरी अजित पवार आणि सुनेत्रा पवार नव्हत्या. काकींना भेटण्यासाठी आपण आलो होतो अस सुप्रिया सुळे म्हणाल्यात.आशा काकींना भेटायला आली होती, त्यांचा आशिर्वाद घ्यायला आली होती. मात्र, या भेटीमुळे सुप्रिया सुळेंच्या समर्थकांच्या मनातही किंचित चलबिचल झाली. तसेच, अजित पवारांच्या राष्ट्रवादीनेही या भेटीवर निशाणा साधला आहे. या भेटीच्या निमित्ताने मतदारसंघात भावनिक वातावरण निर्माण करण्याची ही राजकीय खेळी खेळल्याचा आरोप सुळे यांच्यावर केला आहे.

## रोहित पवार यांची पत्रकार परिषद चर्चेत...



राज्यातील बहुचर्चित बारामती लोकसभा मतदारसंघात आज (7 मे) मतदान पार पडलं. तेव्हा याठिकाणी अनेक घडामोडी पाहायला मिळाल्या. आचारसंहितेचं उल्लंघन केल्याच्या आरोपावरून महायुतीच्या घटक पक्षांतील नेत्यांवर 11 एप्रिलपासून ते 7 मे पर्यंत शरद पवार गटाने 19 तक्रारी निवडणूक आयोगाकडे दाखल केल्या आहेत, असं रोहित पवार यांनी मंगळवारी (7 मार्च) सायंकाळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. याशिवाय शरद पवार गटाकडून 3 FIR दाखल करण्यात आल्या आहेत, असंही त्यांनी मीडियाशी बोलताना सांगितलं. “मतदानाच्या एकदिवस आधी बारामतीमधील PDCC बँक रात्री 1 वाजेपर्यंत चालू होती. आमची याविरोधातली तक्रार आयोगाने गांभीर्याने घेतली आणि रात्री भरारी पथक तिथे गेलं. पण शाखा प्रमुखांनी त्यांना सहकार्य केलं नाही. सीसीटीव्ही फुटेज दिलं नाही आणि मोबाईल बंद करून पळ काढला,” असं रोहित पवार यांनी यावेळी सांगितलं. शेवटी सीसीटीव्ही फुटेज मिळाल्यानंतर त्या बँकेत 40 ते 50 लोक आत बाहेर करत होते आणि त्या बँकेचा वापर पैसे वाटपासाठी केला जात होता, असा आरोपही त्यांनी केला. “निवडणूक आयोगाला सीसीटीव्ही मिळालेला आहे ते काही करू शकत नाही. दादा माझा स्वभाव वेगळा आहे. पीडीसीसी बँकेवर जी कारवाई केली ती कमी आहे, अजून कलम लावा अशी मागणी आहे.चांगली लीड आम्हाला मिळेल, लीड असणार म्हणजे असणार...

# दोन लाख पुणेकरांना ‘व्होटिंग स्लिप’!

## मुरलीधर मोहोळ यांच्या प्रभावी यंत्रणा : प्रचार समन्वयक कोंढाळकर यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मतदानासाठी नागरिकांच्या ‘उत्साहा’बाबत सातत्याने चर्चा होत असतानाच महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या संपर्क कार्यालयातून आजपर्यंत दोन लाख मतदारांनी व्होटिंग स्लिप प्राप्त केल्याची माहिती समोर येते आहे. मोहोळ यांची उमेदवारी सर्वात आधी जाहीर झाल्याने योग्य वेळी प्रचारयंत्रणा कार्यान्वित करता आली, असे प्रचार समन्वयक निलेश कोंढाळकर यांनी सांगितले.**



ते म्हणाले, “निवडणूक आयोगाच्या डेटाबेसनुसार ऑनलाईन आणि ऑफलाईन व्होटिंग स्लिप मिळविण्यासाठी आम्ही महिनाभरापूर्वीच विशेष हेल्पलाईन सुरू केली. तसेच मतदारयादीतील नाव शोधण्यासाठी सर्व प्रचारसाहित्यावर क्यूआर कोड छापण्यात आला. पुण्यातील नागरिक मतदानासाठी उत्सुक असून आणि मतदार स्लिप मिळवण्यासाठी पाठपुरावा करत आहेत. हेल्पलाईनवर संपर्क करीत, कार्यालयात प्रत्यक्ष येऊन स्लिप घेऊन जाणाऱ्या नागरिकांचे प्रमाणही मोठे आहे. गेल्या ३० दिवसांत या यंत्रणेतून किमान दोन लाख नागरिकांनी स्लिप घेतल्या आहेत.” मतदानास अवघे पाच दिवस शिल्लक असल्याने आता घरोघरी जाऊन मोबाईल प्रिंटरच्या आधारे स्लिप वाटपाचे कार्य सुरू असून त्यासाठी दोन हजारांहून अधिक प्रशिक्षित कार्यकर्त्यांची फौज काम करीत असल्याचे कोंढाळकर यांनी सांगितले.

### कोथरूडमधील 38 हजार मतदारांची नावे वगळली?

व्होटिंग स्लिपसाठी मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यालयात संपर्क साधणाऱ्या अनेक नागरिकांना आपले नाव मतदारयादीत नसल्याचे लक्षात येत आहे. गेल्यावेळेस मतदान केलेल्या कोथरूडमधील सुमारे ३८ हजार मतदारांची नावे यावेळेस वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. निवडणूक आयोगाने यादीतील नाव, छायाचित्र, पत्ता इत्यादींसंदर्भात सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी केलेल्या आवाहनांकडे नागरिकांचे दुर्लक्ष झाल्याने त्यांना मतदानाचा हक्क गमवावा लागत आहे, अशी हळहळ राजकीय वर्तुळातून व्यक्त होते आहे. याविषयी निवडणूक आयोगाने एक संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होते आहे.

### मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची शुक्रवारी जाहीर सभा

दरम्यान, मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची जाहीर सभा सारसबाग परिसरात येत्या शुक्रवारी (ता. 10 मे) सायंकाळी 6 वाजता आयोजित करण्यात आली असल्याची माहिती मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. त्या आधी सभेच्या नियोजनासाठी मनसे कार्यालयात भाजप आणि मनसेच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीला मनसे नेते नितीन सरदेसाई, शिरीष सावंत, भाजप शहर अध्यक्ष धीरज घाटे, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, महायुतीचे समन्वयक संदीप खर्डेकर, मनसे शहर प्रमुख साईनाथ बाबर, किशोर शिंदे, गणेश सातपुते, हेमंत संभूस, अजय शिंदे, योगेश खैरे, जयराज लांडगे, बाळा शेडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# खासदारांची निष्क्रीयता म्हणून माझी बदनामी!

## लोकसभा निवडणूक रणसंग्राम: शिवाजीराव आढळराव पाटील यांचा पलटवार

।पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**शिरूर मतदारसंघातील पुणे-नाशिक रेल्वेचा प्रश्न तसेच वाहतुकीचा आणि पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी हजारो कोटींचा निधी लागणार आहे यासाठी केंद्रातल्या सत्तेत बसणारा खासदार म्हणून तुम्ही मला निवडून दिले तर हे प्रश्न सुटतील, विकासकामे मार्गी लागतील, समोरच्या उमेदवाराचा पराभव दिसू लागल्याने माझ्यावर खालच्या स्तरावर टीका करुन माझी बदनामी केली जात आहे. मात्र याला जनता मतदानाच्या माध्यमातून उत्तर देईल असा पलटवार महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव यांनी केला.**




पाच कंदील चौक येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विराट सभा झाली यावेळी आढळराव पाटील बोलत होते. यावेळी महायुतीचे नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आढळराव पाटील म्हणाले,”ही निवडणूक देशाच्या प्रतिष्ठेची आहे. या निवडणूकीत आपण आपल्या देशाचे पंतप्रधान ठरवणार आहोत. येथे खरी लढत विकासपुरुष नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांच्यात आहेत. परंतू कुठल्याही व्यक्तीला विचारले तर पंतप्रधान पदासाठी मोदीजीच हवेत असे नागरिक सांगतात. राम मंदिरासारखा आपल्या अस्मितेचा प्रश्न फक्त मोदीजीच सोडवू शकले. 370 सारखे कलम फक्त मोदीजी यांनीच काश्मीरमधून हटविले. मागील 10 वर्षांत अनेक विकासकामे देशात झाली आहेत. या निवडणुकीनंतर शिरूरच्या चार गावांचा पाणीप्रश्न, जुन्नरच्या आणे पठाराचा पाणीप्रश्न आणि आंबेगावच्या सातगाव पठारचा पाणीप्रश्न मार्गी लावण्यास प्राधान्यक्रम असल्याचेही आढळराव पाटील यांनी सांगितले. येणाऱ्या 13 तारखेला आपण जागृत राहून मला घड्याळाला जास्तीत-जास्त मतदान करावे अशी विनंती पाटील यांनी केली.

गेल्या निवडणूकीत मी पराभूत होऊनही मी पायाला भिंगरी लावून फिरलो, मोठा निधी मतदार संघात आणला आहे. मी 20 वर्षांत अनेक प्रकल्प मतदार संघात आणून मतदारसंघाचा कायापालट केला आहे. 2014-15 च्या दरम्यान आम्ही धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक वढू आणि तुळापूर येथे करण्याचा 140 कोटींचा विकास आराखडा सादर केला. 400 कोटींचा विकास आराखडा मंजूर करुन घेतला. आता त्याचे कामही सुरु झाले आहे. माझे व तुमचे ड्रिम प्रोजेक्ट पुर्ण करायचे असतील तर आपल्याला सत्तेमधील खासदार निवडून द्यावा लागेल. समोरचा विद्यमान खासदार याने पाच वर्षात कुठलेही काम केले नाही. हक्काचा निधी या निष्क्रिय खासदारामुळे परत गेला आहे. सध्या माझ्यावर खोटारडे आरोप केले जात आहेत.

### विरोधात असतानाही पाच वर्षात जनसंपर्क: आढळराव पाटील

गेल्या निवडणूकीत मी पराभूत होऊनही मी पायाला भिंगरी लावून फिरलो, मोठा निधी मतदार संघात आणला आहे. मी 20 वर्षांत अनेक प्रकल्प मतदार संघात आणून मतदारसंघाचा कायापालट केला आहे. 2014-15 च्या दरम्यान आम्ही धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक वढू आणि तुळापूर येथे करण्याचा 140 कोटींचा विकास आराखडा सादर केला. 400 कोटींचा विकास आराखडा मंजूर करुन घेतला. आता त्याचे कामही सुरु झाले आहे. माझे व तुमचे ड्रिम प्रोजेक्ट पुर्ण करायचे असतील तर आपल्याला सत्तेमधील खासदार निवडून द्यावा लागेल. समोरचा विद्यमान खासदार याने पाच वर्षात कुठलेही काम केले नाही. हक्काचा निधी या निष्क्रिय खासदारामुळे परत गेला आहे. माझ्यावर खोटारडे आरोप केले जात आहेत.

# पवार, ठाकरेंची तोफ आज धडाडणार!

## संजोग वाघेरे यांची प्रचार सभा : महासभेकडे पिंपरी-चिंचवडकरांचे लक्ष!

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ महाविकास आघाडीची महासभा बुधवारी (दि. 8) सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर होणार आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची तोफ धडाडणार आहे. या सभेची जोरदार तयारी सुरु असून महाविकास आघाडीच्या या महासभेबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.**



पिंपरी:शिवसेना बाळासाहेब ठाकरे यांचा पक्ष चोरून, बाळासाहेब ठाकरेंचे नाव चोरून आणि पारंपारिक निशाणीवर दावा सांगून गद्दारी केलेल्यांना त्यांची योग्य जागा दाखविण्यासाठी महाविकास आघाडीने संजोग वाघेरे पाटील यांच्या स्वरूपामध्ये एक प्रामाणिक, सजग आणि जनमानसातील प्रश्नांची जाण असणारे उमदे उमेदवार दिले आहेत. त्यांच्या प्रचारार्थ बुधवार (दि. 8) सायंकाळी सहा वाजता महासभेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, समाजवादी पार्टी, शेतकरी कामगार पक्ष, आम आदमी पार्टी, सी. पी. आय. (एम),आर. पी. आय. (ए), स्वाभिमानी रिपब्लिकन युथ पार्टी, स्वराज इंडिया असे महाविकास आघाडीमधील घटक पक्षांचे नेते या महासभेमध्ये आपले विचार मांडणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा विधान परिषद सदस्य आमदार जयंत पाटील, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे संपर्कप्रमुख तथा आमदार सचिनभाऊ अहिर, आम आदमी पार्टीचे खासदार संजय सिंह, काँग्रेसचे खासदार चंद्रकांत हंडोरे हे प्रमुख वक्ते आपले विचार मांडणार आहेत.

### उद्धव ठाकरे यांना जनसामान्यांचा पाठिंबा...

उद्धव ठाकरे यांना जनमानसातून मिळणारा पाठिंबा राज्यभरात चर्चेचा विषय ठरतो आहे. वयाची ऐंशी उलटून देखील संघर्ष योद्धा आधारवड शरद पवार साहेब हे अक्षरशः पायाला भिंगरी लावून महाविकास आघाडीचा प्रचार करत आहेत. जयंत पाटील यांचे आक्रमक भाषण नेहमीच विरोधकांच्या उरात धडकी भरवत असते. पृथ्वीराज चव्हाण यांचे अनुभवी प्रगल्भ आणि मुद्देसूद भाषणाला विरोधकांकडून एक टक्का देखील प्रत्युत्तर मिळत नाही. संजय सिंह आणि चंद्रकांत हंडोरे यांची सडेतोड भाषणे यावेळी होणार आहेत. त्यामुळे नागरिकांना देखील महाविकास आघाडीच्या धडाडणाऱ्या तोफांचे आवाज ऐकण्याची उत्सुकता लागून राहिली आहे. महाविकास आघाडीच्या वतीने सर्व पक्ष, संघटना यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच तमाम नागरिकांना जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

# सोसायट्यांचा पाणी प्रश्न सोडवणार!

## खासदार बारणे यांची ग्वाही : सोसायटीधारकांसोबत साधला संवाद

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठा अपुरा पडत आहे. शहरात मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण संस्था म्हणजेच हाउसिंग सोसायटी वाढत आहेत. त्यांना भेडसावत असलेला पाण्याचा प्रश्न सप्टेंबरपर्यंत सुटलेला असेल, अशी ग्वाही मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी दिली.**



मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार बारणे यांनी शहरातील विविध सोसायटी यांना सदिच्छा भेट देऊन तेथील मतदारांशी संवाद साधला. त्यांच्या समवेत आमदार अश्विनी जगताप, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे, महाराष्ट्र केसरी पैलवान विकी तथा विजय बनकर तसेच महायुतीचे पदाधिकारी होते.

पुनावळे येथील 7 प्लमेरिया ड्राईव्ह, पिंपळे सौदागर येथील साई पर्ल सोसायटी, कुणाल आयकॉन, रोझलँड रेसिडेन्सी, शिवसाई विश्व, चिंचवड येथील क्वीन्स टाऊन सोसायटी, थेरगाव येथील ग्रीन्स सोसायटी आदी ठिकाणी आयोजित बैठकांना बारणे यांनी हजेरी लावली. बहुतेक सोसायट्यांमध्ये सदस्यांनी पाण्याचा प्रश्न उपस्थित केला. त्यावर बारणे यांनी पुढील 30 वर्षांचे पाणीपुरवठ्याचे नियोजन सांगितले. आपण स्वतः लोक सहभागातून गेली आठ वर्षे पवना धरणातील गाळ काढत आहोत. त्यामुळे धरणात एक महिना पुरेल एवढा पाणीसाठा आता वाढला आहे. शहराला शुद्ध पाणीपुरवठा व्हावा यासाठी रावेत ऐवजी शिवणे बंधाऱ्यातून पाणी उचलण्याचे नियोजन आहे. आंध्रा धरणातून मंजूर झालेल्या 265 पैकी 100 दशलक्ष लिटर पाणी लवकरच उपलब्ध होणार असल्यामुळे सप्टेंबर महिन्यापर्यंत शहरातील पाणीटंचाईची परिस्थिती दूर झालेली असेल. या व्यतिरिक्त टाटा कंपनीच्या मुळशी धरणातून महायुती सरकारने पाच टीएमसी पाणीसाठा पिंपरी-चिंचवडला देण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे पुढील 30 वर्षांचा पाण्याचा प्रश्न सुटलेला असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुनावळे येथील 7 प्लमेरिया ड्राईव्ह सोसायटीत झालेल्या बैठकीस संदेश लाड, शिवराज हराळे, उपेंद्र खांबेटे, रामकृष्ण ढोले, अशोक गायकवाड उपस्थित होते. साईपर्ल सोसायटीत अजित शेवाळे, परेश महाजन, हर्षल गिरीकुंजे, रुपेश सैनी यांनी बारणे यांचे स्वागत केले. कुणाल आयकॉन सोसायटीमध्ये नरेंद्र देसाई जयंत बाहुलेकर, राजेश पाटील, सुप्रिया पाटील यांनी बारणे यांचा सत्कार केला. रोझलँड रेसिडेन्सीमध्ये सोसायटीचे अध्यक्ष संदीप ठेंगरे यांनी तर शिवसाई विश्व सोसायटीत अध्यक्ष अनंत चौधरी यांनी सदस्यांच्या वतीने बारणे यांना शुभेच्छा दिल्या.

### बारणेंना लाखांचे मताधिक्य देणार : आमदार जगताप

शिवसैनिकांला मुख्यमंत्री बनवतो म्हणून स्वतःच मुख्यमंत्री झाले. खुर्चीवर बसले. मला मुख्यमंत्री केले नाही, याचे दुःख नाही. परंतु, मुख्यमंत्री बनून काय कमविले याचे आत्मपरीक्षण केले पाहिजे. आरोप करून भागणार आहे का याचा विचार करावा. मी बाळासाहेब, शिवसेनेच्या भूमिकेबाबत तडजोड करणार नाही. त्यामुळे लोक माझ्यासोबत येत आहेत. खरी शिवसेना आपली आहे कारण धनुष्यबाण आपल्याकडे आहे. माझे कुटुंब माझी जबाबदारी एवढ्या पुरते माझे काम नाही. संपूर्ण महाराष्ट्र माझा परिवार आहे. घरात बसून उंटावरून शेळ्या हाकत नाही, असा टोलाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लगविला.

# व्हॉट्सअप: किती खरा, किती खोटा?



## भूमिका

**भारतातील ४० कोटींहून अधिक वापरकर्ते असलेल्या 'इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सअप'ने भारत सोडून जाण्याचा दिलेला इशारा हा अशाच एका दबावाचा भाग आहे. भारत सरकारने माहिती तंत्रज्ञानात केलेले कायदे आम्ही पाळू शकत नाही, अशी भूमिका 'मेटा' आणि 'व्हॉट्स अप'ने घेतली आहे. 'व्हॉट्सन्प' आणि तिची मूळ कंपनी 'मेटा' (पूर्वीचे फेसबुक) यांनी भारताच्या 'आयटी' कायद्याच्या नियमाला न्यायालयात आव्हान दिले आहे.**

उघड करावा अशी सरकारची इच्छा आहे. म्हणजेच हा संदेश कोणी कोणाला पाठFवला याची माहिती सरकारला द्यावी. त्याच वेळी, 'व्हॉट्सअप'चे म्हणणे आहे, की यामुळे लोकांची गोपनीयता धोक्यात येईल. परदेशात लोकांची गोपनीयता अतिशय महत्त्वाची मानली जाते. ज्याचा त्याचा स्पेस ठरलेला असतो. कुणी त्यात ढवळाढवळ करीत नाही. भारताने जो कायदा केला, तो जगभरात कुठेही नाही. त्यामुळे भारततही हा कायदा लागू करू नये, असा या कंपन्यांचा दावा आहे. सुरक्षेमुळे लोक निर्भयपणे त्याचे प्लॅटफॉर्म वापरतात. जर 'व्हॉट्सअप'ने संदेशांचे एन्क्रिप्शन तोडले तर हे प्लॅटफॉर्म नष्ट होईल, असा बचाव या दोन्ही कंपन्यांनी केला. दिल्ली उच्च न्यायालयात 'व्हॉट्सअप'ची बाजू मांडणारे वकील तेजस कारिया यांनी स्पष्टपणे सांगितले, की जर आम्हाला एन्क्रिप्शन तोडण्यास सांगितले तर व्हॉट्सअप येथून निघून जाईल.



भारताला हा दिलेला उघड उघड इशारा आहे. केंद्र सरकारने २५ फेब्रुवारी २०२१ रोजी 'आयटी' नियम जाहीर केले होते. यानंतर ट्विटर, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सअपसारख्या सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर या नियमाचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या नियमाला आव्हान देत 'व्हॉट्सअप'ने केंद्र सरकारविरोधात कायदेशीर लढाई सुरू केली आहे. 'व्हॉट्सअप'ने असा युक्तिवाद केला आहे की ते त्याच्या 'एंड-टू-एंड एन्क्रिप्शन'चा भंग केल्याशिवाय भारताच्या नवीन 'आयटी' नियमांचे पालन करू शकत नाही. 'व्हॉट्सअप'चे एंड-टू-एंड एन्क्रिप्शन वैशिष्ट्य संदेशांना अशा प्रकारे एन्क्रिप्ट करते, की ते ट्रॅक केले जाऊ शकत नाहीत आणि ते फक्त पाठविणारा आणि प्राप्तकर्ता वाचू शकतो. 'व्हॉट्सअप'चे म्हणणे आहे, की या फीचरद्वारे ते वापरकर्त्यांची गोपनीयता राखते. २०२१ मध्येच, 'व्हॉट्सअप'ने न्यायालयात याचिका दाखल केली होती, की सरकारी आदेश त्याचे 'एंड-टू-एंड एन्क्रिप्शन' आणि त्याचे फायदे धोक्यात आणत आहेत. 'व्हॉट्सअप'ने उच्च न्यायालयात नियम ४(२) असंवैधानिक घोषित करून त्यांना 'आयटी' कायद्याच्या कक्षेतून वगळण्याची विनंती केली आहे.' व्हॉट्सअप'च्या मते, संदेशाच्या स्त्रोताची ओळख उघड करणे आणि त्याचा शोध घेणे घटनाबाह्य आहे आणि वापरकर्त्यांच्या गोपनीयतेच्या मूलभूत अधिकाराच्या विरोधात आहे. सरकारचा असा युक्तिवाद आहे, की बनावट बातम्या आणि द्वेषयुक्त भाषण यांसारख्या गोष्टींना आळा घालण्यासाठी संदेश कुणी पाठविला, याचा मागोवा घेणे आवश्यक आहे. सरकारचा असा विश्वास आहे, की 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म ऑनलाइन सुरक्षिततेसाठी जबाबदार आहेत, ते त्यांच्या जबाबदारीतून सुटू शकत नाहीत. एक सुरक्षित सायबरस्पेस तयार करण्याचा आणि स्वतःहून किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सींद्वारे बेकायदेशीर सामग्री ब्लॉक करण्याचा अधिकार सरकारला आहे.न्यायालयाला सांगितले आहे, की आयटी' कायद्याच्या कलम ८७ ने नियम ४ (२) तयार करण्याचा अधिकार दिला आहे. त्याअंतर्गत 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मला माहितीचा स्रोत उघड करावा लागेल. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक सुव्यवस्थेचे रक्षण करण्यासाठी तसेच खोट्या बातम्या आणि महिला आणि मुलांशी संबंधित संभाव्य गुन्हे रोखण्यासाठी हे आवश्यक आहे. केंद्र सरकारने असेही म्हटले आहे, की जर एखादा प्लॅटफॉर्मला कर्तव्याचा भाग संदेशाचा मागोवा सादर करता आला पाहिजे. भारतासारखा कायदा अन्य कोणत्याही देशात नाही, असा दावा 'व्हॉट्स?प'ने केला आहे. 'व्हॉट्सअप'च्या वतीने हजर असलेल्या वकिलाने सांगितले, की जगात कुठेही असा नियम नाही. २०२३ मध्ये ब्रिटन सरकारने मान्य केले, की ते हानिकारक सामग्री टाळण्यासाठी मेसेजिंग ॲप्स स्कॅन करण्यासाठी ऑनलाइन सुरक्षा विधेयकातील अधिकार वापरणार नाहीत.

## संपादकीय »

### शेजार'धर्म'!

***मुसलमान तर चीनमध्येही आहेत, पण निवडणूक प्रचारात हिंदूमुसलमान दुही निर्मितीसाठी कधी चीनचे नाव घेतले जात नाही...***

वा काँग्रेस पक्ष जिंकला तर पाकिस्तानात दिवाळी साजरी केली जाईल ही विधाने अथवा "तुमच्या मताने कोठे जल्लोष व्हायला हवा आहे... भारतात की पाकिस्तानात" हा सत्ताधारी भाजपच्या जाहिरातीतील प्रश्न ही या निवडणुकांत पाकिस्तानचे सुखेनैव आगमन झाल्याची चिन्हे. गेली दहा वर्षे खरे तर आपल्या देशावर कडव्या देशभक्त, राष्ट्रवादी, देशाच्या सुरक्षेत सदैव जागरूक इत्यादी पक्षाचे सरकार आहे. म्हणजे पाकिस्तानची डाळ शिजण्याचा प्रश्न नाही. तसेच या सरकारच्या काळात विकासाचा वारू चौखूर उधळत असल्याचेही आपणास सांगितले जात आहे. या विकासाच्या गतीने विकसित देशांच्या नेत्यांचे डोळे दिपून त्यांच्या डोळ्यासमोर अंधारी आल्याची माहिती जनतेस दिली जात आहे. इतकेच नव्हे तर भारताच्या पंतप्रधानांचा मानमरातब आता अमेरिकादी बड्या देशांच्या प्रमुखांस झाकोळून टाकेल हेही सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे.

निवडणुकीच्या पहिल्या दोन टप्प्यांचे मतदान आटोपले आहे. आता ते कमी झाले तर ते कुणाच्या फायद्याचे, अशा मनोरंजक चर्चा सुरू राहणारच! टिव्ही वाहिन्यांवरील मालिकांमध्ये त्या भागाचा शेवट करताना एक 'हुक पॉइंट' दिला जातो. म्हणजे नायिकेला मारायला कुणी आले आहे आणि ती आता दार उघडायला दारापाशी आली आहे.

# तरीही सत्ता हिंदुत्ववादी विचारांचीच!

लोक दुसऱ्या दिवशीचा भाग अगदी सुरुवात न चुकवता पाहतात... टीआरपीची गणिते असतात ही. तसेच या निवडणुकीचे आहे. याची पटकथा, संवाद कोण लिहीत असते हे अखेरपर्यंत कळत नाही; पण आता पहिल्या टप्प्यानंतर भाजपने आपल्या प्रचाराची निती बदलली आहे. पंतप्रधान मोदी यांनी थेटच काँग्रेसच्या अल्पसंख्याकांच्या तुष्टीकरणाला पुन्हा हात घातला आहे. दलित, बहुजन हा मतदार घटना बदलण्याच्या काँग्रेसच्या प्रचाराने दूर जातो आहे, हे लक्षात आल्यावर आता काँग्रेसची सत्ता आली, तर बहुजनांची संपत्ती आणि आरक्षण अल्पसंख्याक बहुलेकूरवाळ्यांना (म्हणजे कोण ते वेगळे काय सांगायचे?) वाटून देणार आहे, असा थेट हल्ला करण्यात आला आहे. भाजपा सुरुवातीच्या प्रचारात उत्तरदायी ठरत होता. काँग्रेसच्या 'घटना बदलणार' या प्रचाराला भाजपला उत्तरे द्यावी लागत होती. आता भाजपाने नॅरेटिव्ह सेट केल्याने काँग्रेसला उत्तरे



द्यावी लागत आहे.अर्थातच भाजपचा पूर्ण चेहरा पंतप्रधान मोदी हेच आहेत. मोदी राजवटीला लोक कंटाळले आहेत, नापसंती निर्माण झाली आहे, असे वातावरण असताना विरोधी पक्षात कोण? असा सवाल केला जातो. मोदींनी विरोधी पक्षातही कुणालाच शिल्लक ठेवलेले नाही. राहुल गांधींचा 'पप्पू' केला होता, त्यातून ते बाहेर पडत आहेत. तरीही राहुल गांधी देशाचे नेतृत्व करू शकतील, यावर जनतेचा विश्वास नाही. त्यामुळे मोदी नको, तर मग कोण? असा प्रश्न समर्थकांकडून विचारला जातो. मोदींनी विरोधात कुणाला उभेच राहू दिले नाही. बाहेर नाही अन् पक्षातही नाही. त्यामुळे भाजपकडून जे काय महत्त्वाचे बोलायचे ते मोदीच बोलतात आणि मग त्यांनी म्हटलेले प्रचाराचे स्तोत्र त्यांचे इतर तारांकित प्रचारक म्हणतात. अर्थात भाजपात इतर तारे प्रचारक हे मिणमिणते आहेत. आता नंतरच्या टप्प्यासाठी ही नीती आली ती मोदी नागपूरला तब्बल १० तास मुक्काम करते झाल्यावरच, असे युट्युबच्या वाहिन्या सांगत आहेत. बहुजन हिंदू म्हणून आपल्या पाठीशी उभे राहिले तर अल्पसंख्याकांच्या मतांसाठी त्यांचे तुष्टीकरण करण्याची गरज नाही. त्यांना सत्तेमागे फरफटत यावेच लागेल अन् नाही आले तर त्यांची अवस्था काय होईल, हे विविध उदाहरणांतून न बोलता सांगितले जाते. दलित मतांमध्येही हिंदू दलितांचीही संख्या मोठी आहे. इतर दलित आणि मुस्लीम मतांचे धृवीकरण करण्यासाठी ओवेसी, प्रकाश आंबेडकर, मायावती हे आहेत. बहुजनांना अल्पसंख्याकांच्या बाबतीत आक्रमक भूमिका घेतल्याने बरे वाटते. आपला धर्म आपणच राखला पाहिजे, हे त्यांना विविध मार्गांनी पटवून देण्यात आले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 11 राज्यांमध्ये 93 जागांसाठी मतदान !

## 5 वाजेपर्यंत 63.77% ; महाराष्ट्रात सर्वात कमी 54.77% मतदान

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मंगळवारी सकाळी 7 वाजल्यापासून 10 राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील 93 लोकसभा जागांसाठी मतदान संपन्न झाले. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, संध्याकाळी 5 वाजेपर्यंत 63.77 टक्के मतदान झाले आहे. पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक 73.93% आणि महाराष्ट्रात सर्वात कमी 53.40% मतदान झाले.**



दुपारी 3 वाजेपर्यंत 53.60 टक्के मतदान झाले. पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक 63.11% आणि महाराष्ट्रात सर्वात कमी 53.40% मतदान झाले. बिहारमध्ये मतदानादरम्यान पीठासीन अधिकारी आणि होमगार्ड जवानाचा मृत्यू झाला आहे. छत्तीसगडच्या जशपूरमध्ये मतदानासाठी येत असताना एका वृद्ध मतदाराचा मृत्यू झाला. त्याच वेळी, पश्चिम बंगालमध्ये मुर्शिदाबादचे भाजप उमेदवार आणि टीएमसी समर्थकांमध्ये हाणामारी झाली. उत्तर प्रदेशातील संभलमध्ये पोलिसांनी लोकांवर लाठीचार्ज केला. यामध्ये काही जण जखमी झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहमदाबादमधील निशान उच्च माध्यमिक विद्यालयात मतदान केले. त्यांच्यासोबत गृहमंत्री अमित शहाही उपस्थित होते. पंतप्रधानांनी पांढरा कुर्ता-पायजमा आणि भगवे जाकीट परिधान केले होते. तर अमित शहा भगव्या रंगाचा गमछा सोबत पांढरा कुर्ता-पायजमा घेऊन आले होते. गाडीतून उतरल्यानंतर अमित शाह यांच्यासह पंतप्रधान मोदी पायीच बूथवर पोहोचले आणि लोकांना अभिवादन केले. मतदान केल्यानंतर पंतप्रधानांनी मुलांच्या हाताला ऑटोग्राफ दिला. लोकांसोबत फोटो क्लिक केले. प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी जनतेला मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले. तसेच उष्णता पाहता भरपूर पाणी पिण्यास सांगितले. यापूर्वी १९ एप्रिलला पहिल्या टप्प्यात १०२ जागांवर आणि २६ एप्रिलला दुसऱ्या टप्प्यात ८८ जागांवर मतदान झाले होते. तिसऱ्या टप्प्यातील 93 जागांचा समावेश झाल्यास आज संध्याकाळी 283 जागांवर मतदान पूर्ण होईल. 4 जूनला निकाल लागणार आहे.राज्यात आज लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात 11 जागांसाठी मतदान झाले आहे. सकाळी 7 वाजेपासून मतदानाला सुरुवात झाली तर सायंकाळी 6 वाजेपर्यंत सर्वच मतदान केंद्रावंर मतदाराच्या रांगा पाहायला मिळाल्या.तर लातूर - 55.38 %, सांगली - 52.56 %, बारामती - 45.38%, हातकणंगले- 62.18%, कोल्हापूर - 63.71%, माढा - 50%, धाराशिव - 52.78%, रायगड - 50.31%, रत्नागिरी - 53.75%, सातारा - 54.11% व सोलापूर लोकसभा मतदारसंघात 49.7% मतदान झाले. यात विशेष करून कोल्हापूर व हातकणंगले लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक मतदान झाले. तर बारामती लोकसभा मतदारसंघात सर्वात कमी मतदान झाले आहे. तापमानाचा पारा किंचित खाली आला तरी उष्मा कायम असल्यामुळे अंगाची लाही लाही होत असतानाही सोलापूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेस व भाजपच्या तुल्यबळ लढतीत चुरशीने मतदान झाले. सकाळी आणि सायंकाळी मतदार केंद्रांवर मतदानासाठी मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. सायंकाळी पाच वाजेपर्यंत ४९.८५ टक्के मतदान झाल्याची अधिकृत माहिती निवडणूक अधिका-यांकडून देण्यात आली. शेवटच्या तासात मतदारांचा उत्साह सर्वत्र दिसून आला. सायंकाळी सहा वाजता मतदान प्रक्रिया संपली तेव्हा सुमारे ५५ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला जात आहे. मागील २०१९ सालच्या लोकसभा निवडणुकीत सोलापुरात ५८.४५ टक्के इतके मतदान झाले होते.

### निराधार व तथ्यहीन आरोप

सोलापुरात काँग्रेसच्या प्रणिती शिंदे व भाजपचे राम सातपुते या दोन्ही तरूण आमदारांमध्ये चुरशीची लढत झाली. त्यांच्यासह बसपाचे बबलू गायकवाड व वंचित बहुजन आघडी पुरस्कृत अपक्ष उमेदवार अतिश बनसोडे आदी २१ उमेदवारांचे भवितव्य मतयंत्रात बंद झाले. मात्र मुख्य लढत प्रणिती शिंदे आणि राम सातपुते यांच्यातच पाहायला मिळाली. सायंकाळी पाच वाजेपर्यंत एकूण २० लाख ३० हजार ११९ मतदारंपैकी १० लाख ११ हजार ९४४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. याशिवाय १२.५६ टक्के तृतीय पंथीय मतदारांनी मतदान केले. एकूण मतदानाची टक्केवारी ४९.८५ इतकी होती. पुरूषांच्या मतदानाची टक्केवारी ५२.३० तर महिला मतदारांची मतदानाची टक्केवारी तुलनेने कमी ४७.२७ एवढी होती. शेवटच्या तासाभरात मतदानाचा वेग वाढला होता.सोलापुरात गेल्या १५ दिवसांपासून तापमानाचा पारा ४१ आंशांपेक्षा जास्त असून अलिकडे तर त्यात वाढ होऊन ४४ अंशांपेक्षा जास्त तापमान आहे. काल सोमवारी ४४.१ अंश सेल्सियस तापमानाचा पारा होता. मंगळवारी मतदानाच्या दिवशी तापमानाचा पारा काहीसा खालावून ४२.२ अंशांवर खाली आला तरी उष्म्याची धग कायम होती. सकाळपासून उन्हाचे असह्य चटके बसत होते.

# ८४ वर्षांच्या योद्ध्याला तुम्ही लढायला लावताय

## अजित पवारांची शरद पवार गटाच्या नेत्यांवर टीका

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आज तिसऱ्या टप्प्यात १२ राज्यांमध्ये ९४ जागांसाठी मतदान होत असून बारामती लोकसभा मतदारसंघ हा हायवोल्टेज मतदारसंघ ठरला आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने नणंद-भावजयीमध्ये अटीतटीची लढत सुरू आहे.**



या जागेसाठी दोन्ही पक्षाकडून तुफान प्रचारसभा रंगल्या. एका बाजूला शरद पवार तर दुसऱ्या बाजूला अजित पवार अशी ही अलिखित लढत आहे. यावरून अजित पवारांनी शरद पवार गटातील नेत्यांवर टीका केली आहे. ते बोल भिडूला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते.देशभरात भाजपाविरोधी वातावरण आहे. त्यामुळे मतदार आणि गावातील सरपंचांना धमकी दिली जात आहे. भाजपाला त्यांचा पराभव दिसू लागला आहे. पराभव दिसताच भाजपाकडून हिंदू-मुस्लीम बारामती लोकसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीने विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांना उमेदवारी दिली. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यामुळे ही जागा महत्त्वाची मानली जात आहे. तर, अजित पवार गटाने सुनेत्रा पवारांना संधी दिली आहे. सुप्रिया सुळेंच्या प्रचारानिमित्त शरद पवारांनी ठिकठिकाणी सभा घेतल्या. लोकांशी संवाद साधला. परिणामी आचारसंहिता लागताच शरद पवारांची प्रकृती खालावली. याबाबत अजित पवारांना विचारले असता ते म्हणाले, माझ्या मनात विचार आला की २००४ सालीही अशाच पद्धतीने शरद पवारांना गंभीर आजार झाला होता. साहेबांचा आम्ही निवडणूक उमेदवारीचा फॉर्म भरला आणि साहेबांनी आम्हाला सांगितलं की ऑपरेशन तातडीने करणं गरजेचं आहे. त्यामुळे आता सेनापती निवडणुकीत नाहीय, सैन्यानं ही निवडणूक लढवायची आहे.तेव्हा आम्ही सर्व 'निसर्ग'ला होतो. आर. आर पाटील, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, जयंत पाटीलसह अनेक दिग्गज नेते होते. (साहेबांनी ऑपरेशनची माहिती दिल्याक्षणी) आमच्या डोळ्यांत पाणी आलं. आम्ही विचार केला की प्रचाराचा फॉर्म भरल्यानंतर तिथंच सभा होती. ती सभा झाल्या झाल्या आम्ही जबाबदारी उचलली आणि साहेबांना ब्रीच कॅन्डी रुग्णालयात दाखल केलं.

### मी त्यांच्याबरोबर असतो तर...

ते पुढे म्हणाले, "आताच्या काळात सर्वांनी सांगायला पाहिजे होतं की अशा पद्धतीने दगदग करू नका. तुम्ही आराम करा. आम्ही निवडणुकीची जबाबदारी उचलू. जयंत पाटील, अमोल कोल्हे, रोहित पवार, जितेंद्र आव्हाड, सुप्रिया स्वतः आता जे साहेबांजवळ आहेत त्यांनी ही जबाबदारी पार पाडायला पाहिजे होती." "मी जर त्यांच्याबरोबर असतो तर मी सांगितलं असतं की, २००४ ला असाच प्रसंग आला, तेव्हा आम्ही ती जबाबदारी पार पाडली,.

# भाजपा लोकांच्या जिवाशी खेळ करते!

## निवडणुकांच्या तोंडावर जिंकण्यासाठी केलेला स्टंट; चरणजीत सिंग चन्नी यांचं स्पष्टीकरण

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पूंछमध्ये हवाई दलाच्या गाडीवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर गेल्या काही दिवसांत सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली आहे. या पार्श्वभूमीवर या घटनेचे पडसाद राजकीय वर्तुळातही उमटताना पाहायला मिळत आहेत. यासंदर्भात पंजाबचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते चरणजीत सिंग चन्नी यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याची जोरदार चर्चा चालू आहे. याच विधानाबाबत आता चन्नी यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर (ट्विटर) एक पोस्ट लिहून त्यांनी त्यांची भूमिका मांडली आहे.**



दहशतवाद्यांकडून भारतीय वायुसेनेच्या वाहनावर गोळीबार करण्यात आला होता. शनिवारी जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील सुरनकोट येथील सनई गावात ही घटना घडली होती. या हल्ल्यात एक जवान शहीद झाला असून चार जवान गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेवर प्रतिक्रिया देताना पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजीत सिंग चन्नी यांनी त्यांची प्रतिक्रिया दिली होती. चरणजीत सिंग चन्नी यांनी या घटनेवर भाष्य करताना म्हटले होते की, "केंद्रातील भाजपा सरकार अशा दहशतवादी हल्ल्यांच्या घटनांचा फायदा घेते. हे दहशतवादी हल्ले नाहीत तर निवडणुकांच्या तोंडावर निवडणुका जिंकण्यासाठी केलेला स्टंट आहे. भाजपा लोकांच्या जिवाशी खेळ करत आहे."या वादग्रस्त वक्तव्यावरून भाजपाच्या नेत्यांनी चन्नी यांच्यावर जोरदार टीका करत त्यांना धारेवर धरलं होतं. भाजपासह काँग्रेसच्याही काही नेत्यांनी चरणजीत सिंग चन्नी यांनी माफी मागावी अशी भूमिका घेतली होती. त्यानंतर चन्नी यांनी स्पष्टीकरण दिले आहे.या विवादित वक्तव्यानंतर त्यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट टाकली आहे. ते म्हणाले, "पूंछ जिल्ह्यातील घटनेसंबंधी माझं वक्तव्य मी वर्तमानपत्रात वाचलं. मी त्यामध्ये इतकंच म्हणालो होतो की अशा घटनांचा फायदा घेण्याचा प्रयत्न सरकारकडून होतो. मी फक्त सत्ताधारी पक्षाची मानसिकता तशी असल्याचं माझ्या वक्तव्यात म्हणालो. माझी देशाच्या सैनिकांबद्दल आदराची भावना आहे".चन्नी या पोस्टमध्ये पुढे म्हणाले, "जवानांच्या त्यागापुढे, हौतात्म्यापुढे मी नेहमीच नतमस्तक होतो. देशाच्या सीमेवर लढणारे सैनिक असल्यामुळे आपण सुरक्षित जीवन जगतो. दहशतवाद्यांकडून भारतीय वायुसेनेच्या वाहनांवर गोळीबार करण्यात आला. त्यात आपला एक जवान शहीद झाला. मी त्याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. पूंछमध्ये हवाई दलाच्या गाडीवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर गेल्या काही दिवसांत सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली आहे. या पार्श्वभूमीवर या घटनेचे पडसाद राजकीय वर्तुळातही उमटताना पाहायला मिळत आहेत. यासंदर्भात पंजाबचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते चरणजीत सिंग चन्नी यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याची जोरदार चर्चा चालू आहे. शनिवारी जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील सुरनकोट येथील सनई गावात ही घटना घडली होती. या हल्ल्यात एक जवान शहीद झाला असून चार जवान गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेवर प्रतिक्रिया देताना पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजीत सिंग चन्नी यांनी त्यांची प्रतिक्रिया दिली होतीचरणजीत सिंग चन्नी यांनी या घटनेवर भाष्य करताना म्हटले होते की, "केंद्रातील भाजपा सरकार अशा दहशतवादी हल्ल्यांच्या घटनांचा फायदा घेते. हे दहशतवादी हल्ले नाहीत तर निवडणुकांच्या तोंडावर निवडणुका जिंकण्यासाठी केलेला स्टंट आहे. भाजपा लोकांच्या जिवाशी खेळ करत आहे

### हौतात्म्यापुढे मी नतमस्तक होतो

."या वादग्रस्त वक्तव्यावरून भाजपाच्या नेत्यांनी चन्नी यांच्यावर जोरदार टीका करत त्यांना धारेवर धरलं होतं. भाजपासह काँग्रेसच्याही काही नेत्यांनी चरणजीत सिंग चन्नी यांनी माफी मागावी अशी भूमिका घेतली होती. त्यानंतर चन्नी यांनी स्पष्टीकरण दिले आहे.या विवादित वक्तव्यानंतर त्यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट टाकली आहे. ते म्हणाले, "पूंछ जिल्ह्यातील घटनेसंबंधी माझं वक्तव्य मी वर्तमानपत्रात वाचलं. मी त्यामध्ये इतकंच म्हणालो होतो की अशा घटनांचा फायदा घेण्याचा प्रयत्न सरकारकडून होतो. मी फक्त सत्ताधारी पक्षाची मानसिकता तशी असल्याचं माझ्या वक्तव्यात म्हणालो. माझी देशाच्या सैनिकांबद्दल आदराची भावना आहे".चन्नी या पोस्टमध्ये पुढे म्हणाले, "जवानांच्या त्यागापुढे, हौतात्म्यापुढे मी नेहमीच नतमस्तक होतो. देशाच्या सीमेवर लढणारे सैनिक असल्यामुळे आपण सुरक्षित जीवन जगतो. दहशतवाद्यांकडून भारतीय वायुसेनेच्या वाहनांवर गोळीबार करण्यात आला. पूंछमध्ये हवाई दलाच्या गाडीवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर गेल्या काही दिवसांत सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली आहे. या पार्श्वभूमीवर या घटनेचे पडसाद राजकीय वर्तुळातही उमटताना पाहायला मिळत आहेत.

---

# मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिलासा नाहीच

## अंतरिम जामिनाच्या याचिकेवर न्यायालयाने निर्णय घेतलेला नाही

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे मद्यधोरण प्रकरणात अटकेत आहेत. त्यांच्या जामीन अर्जावर आज सुनावणी पार पडली. मात्र कुठलाही दिलासा त्यांना मिळालेला नाही. त्यांच्या न्यायालयीन कोठडीत २० मेपर्यंत वाढ झाली आहे. भारतात लोकसभा निवडणूक सुरु आहे त्यामुळे अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर विचार करता येईल असं मत न्यायालयाने गेल्या आठवड्यात व्यक्त केलं होतं.**

त्या जामीन अर्जावर सुनावणी पार पडली. मात्र न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना कुठलाही दिलासा दिलेला नाही. त्यांच्या न्यायालयीन कोठडीत २० मे पर्यंत वाढ केली आहे. त्यामुळे त्यांचा तुरुंगातला मुक्काम वाढला आहे.दिल्ली न्यायालयाने हा निर्णय दिलेला असताना अरविंद केजरीवाल यांना अंतरिम दिलासा देण्याबाबतही सर्वोच्च न्यायालयाने निर्णय घेतलेला नाही.

अंतरिम जामिनाच्या याचिकेवर कुठलाही निर्णय घेण्यात आलेला नाही. अरविंद केजरीवाल यांनी कथित मद्य घोटाळा प्रकरणात जी अटक त्यांना करण्यात आली त्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका दाखल केली होती तसंच अंतरिम जामीन मिळावा म्हणून



न्यायालयात अर्ज केला होता. दिल्लीतील कथित मद्य धोरण गैरव्यवहारप्रकरणी ईडीने अरविंद केजरीवाल यांना अटक केली.

ईडीने गुरुवारी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानाची झडती घेतली. दिल्ली उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास आणि कोणतेही संरक्षण देण्यास नकार दिल्यानंतर त्यांची चौकशी करण्यात आली आणि नंतर त्यांना अटक करण्यात आली. केजरीवाल हे अटक झालेले आजवरचे पहिले मुख्यमंत्री आहेत. या प्रकरणात अटक करण्यात आलेले आम आदमी पक्षातील ते तिसरे ज्येष्ठ नेते आहेत. यापूर्वी आपचे खासदार संजय सिंह आणि दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनादेखील मद्य धोरण प्रकरणात अटक करण्यात आली आहे.

अरविंद केजरीवाल यांचे वकील म्हणाले की "केजरीवाल हे लोकांनी निवडून दिलेले मुख्यमंत्री आहेत. निवडणुका लक्षात घेता जामीन दिला जावा असं आमचं म्हणणं आहे. तसंच ईडीला सर्वोच्च न्यायालयाने हा देखील सवाल केला की जर घोटाळा १०० कोटींचा आहे तर ११०० कोटी कसे काय जप्त करण्यात आले?

### कोठडीत 20 मेपर्यंत वाढ

कोणत्याही यंत्रणेने दोन वर्षे तपास लटकत ठेवता कामा नये असंही कोर्टानेही म्हटलं आहे. मात्र दिल्ली कोर्टाने त्यांना दिलासा दिलेला नाही. तसंच सर्वोच्च न्यायालयानेही निर्णय राखून ठेवला आहे.दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे मद्यधोरण प्रकरणात अटकेत आहेत. त्यांच्या जामीन अर्जावर आज सुनावणी पार पडली. मात्र कुठलाही दिलासा त्यांना मिळालेला नाही. त्यांच्या न्यायालयीन कोठडीत २० मेपर्यंत वाढ झाली आहे. भारतात लोकसभा निवडणूक सुरु आहे त्यामुळे अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर विचार करता येईल असं मत न्यायालयाने गेल्या आठवड्यात व्यक्त केलं होतं.

# अनन्याचा संगीत क्षेत्राला अलविदा



आपल्या सुपरहिट इंग्रजी गाण्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या गायिकेनं आता गाणी गाणार नसल्याचं म्हटलं आहे. 'होल्ड ऑन' आणि 'लिविन द लाइफ' या सारख्या सुप्रसिद्ध गाण्यांना आवाज देणारी अनन्या आता संगीत क्षेत्र सोडत आहे, तिने सोशल मीडियावर हे क्षेत्र सोडण्याबद्दल पोस्ट शेअर केली आहे.अनन्या ही आदित्य बिर्ला ग्रुपचे प्रमुख कुमार मंगलम बिर्ला यांची मुलगी आहे. २९ वर्षीय अनन्याने आजवर एकापेक्षा एक सुमधूर गाणी गायली आहे. सोशल मीडियावर लाखो फॉलोअर्स असलेली अनन्या हिने यापुढे गाणी गाणार नसल्याचं जाहीर केलं आहे. तिने हा निर्णय का घेतला, याचं कारणही तिच्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये सांगितलं आहे. अनन्याने गायन सोडण्याचा निर्णय जाहीर केल्याव तिचे चाहते नाराज झाले आहेत. अनन्याने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक लांबलचक पोस्ट शेअर करून तिच्या निर्णयाची घोषणा केली आहे. "मित्रांनो, हा सर्वात कठीण निर्णय होता. मी अशा लेव्हलला पोहोचले आहे जिथे माझा व्यवसाय आणि संगीत या दोन्ही गोष्टी एकाच वेळी सांभाळणं जवळजवळ अशक्य झाल आहे आणि त्याचा माझ्यावर अशा प्रकारे परिणाम होत आहे की मी सांगू शकत नाही.

# दीपिका पदुकोणचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल

६ मे रोजी न्यूयॉर्क येथे मेट गाला पार पडला जिथे आलिया भट्ट, ईशा अंबानीसह इतर अभिनेत्रींनी हजेरी लावली होती. परंतु यावर्षी अभिनेत्री दीपिका पदुकोण या फॅशन इवेंटमध्ये हजर राहू शकली नाही. लवकरच आई होणारी दीपिका तिचा क्वालिटी टाईम रणवीरसह आणि होणाऱ्या बाळासह घालवण्यात व्यग्र असल्याच्या चर्चा सुरू आहेत. दीपिका पदुकोण, रणवीर सिंगचा एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय. या फोटोत दीपिका आणि रणवीर एका जहाजातून उतरताना दिसतायत. दीपिकाने या फोटोत लूज टीशर्ट ड्रेस आणि निळ्या रंगाची जिन्स परिधान केलीय तर रणवीर सिंगने ऑल व्हाईट लूकची निवड केली आहे. या फोटोमध्ये दीपिकाचं बेबी बंप दिसतंय असं चाहते म्हणतायत.रणवीर आणि दीपिकाचा हा अनसीन



फोटो रेडीटवर व्हायरल होतोय. या व्हायरल फोटोवर चाहत्यांच्या भरभरून कमेंट्स आल्या आहेत. एका चाहत्याने कमेंट करत लिहिलं, "दीपिकाचा बेबी बंप दिसत आहे." तर दुसऱ्याने कमेंट करत लिहिलं, "देव या जोडप्याला आशीर्वाद देवो."यापूर्वी दीपिका आगामी चित्रपट 'सिंघम अगेन'च्या सेटवर ॲक्शन सीक्वेन्सचं शूटिंग करण्यासाठी आली होती. त्यावेळेस अभिनेत्रीचे पोलिसांच्या गणवेशातले फोटोज सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. लग्नाच्या सहा वर्षांनंतर दीपिका आणि रणवीर आई-बाबा होणार आहेत. २९ फेब्रुवारीला याबाबत दीपिका-रणवीरने चाहत्यांना 'गुड न्यूज' दिली होती. या कपलने सोशल मीडियावर एक खास पोस्ट शेअर केली होती. या पोस्टमध्ये 'सप्टेंबर २०२४' असे लिहिले होते आणि त्याच्या खाली तिचे व रणवीरचे नाव लिहिले होते. तसेच या पोस्टमध्ये लहान बाळाचे कपडे व खेळण्यांचे चित्रही रेखाटले होते.दरम्यान, दीपिका पदुकोणच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर दीपिका नुकतीच 'फायटर'मध्ये झळकली होती. 'सिंघम अगेन' या आगामी चित्रपटातदेखील दीपिका दिसणार आहे. १५ ऑगस्टला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# आलिया भट्टचा देसी अंदाज!

जगात सर्वात प्रतिष्ठित आणि ग्लॅमरस समजल्या जाणाऱ्या 'मेट गाला २०२४' या इव्हेंटला नुकतीच सुरुवात झाली आहे. दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या सोमवारी न्यूयॉर्कमधील मॅनहटन येथे या सोहळा आयोजित करण्यात येतो. यावेळी बॉलीवूड अभिनेत्री आलिया भट्टने मेट गालामध्ये सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. आलियाचा परदेशातील हा देसी अंदाज सर्वांनाच भावला. तिने साडी नेसून आपल्या देशाचं प्रतिनिधित्व केल्याने सध्या सोशल मीडियावर आलियाचं कौतुक करण्यात येत आहे. या सोहळ्याला दरवर्षी जगभरातील नामांकित लोक उपस्थित राहतात.मेट गाला २०२४' मध्ये आलियाने मिंट ग्रीन रंगाची सुंदर अशी डिझायनर साडी नेसली होती. या लूकमध्ये ती अतिशय सुंदर दिसत होती. बॉलीवूडचा प्रसिद्ध डिझायनर सब्यसाचीने तिच्यासाठी ही खास साडी डिझाइन केली होती. यावर आलियाने सुंदर दागिने आणि क्लासिक हेअरस्टाइल केल्याने तिच्या संपूर्ण लूकला पूर्णत्व आलं होतं.आलिया भट्टच्या या भरजरी साडीची अनेक वैशिष्ट्ये आता समोर आली आहेत. तब्बल १६३ कारागिरांनी मिळून आलियाची ही खास साडी डिझाइन केलेली आहे.



# शेखर सुमनने केला भाजपामध्ये प्रवेश

देशभरात आज लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी मतदान पार पडतंय. याचदरम्यान एका लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्याने भाजपामध्ये प्रवेश केला आहे. १५ वर्षांपूर्वी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवल्यानंतर या अभिनेत्याला पराभवाचा सामना करावा लागला होता. १ मे रोजी प्रदर्शित झालेल्या संजय लीला भन्साळींच्या 'हीरामंडी' वेब सीरिजमध्ये या अभिनेत्याची महत्त्वाची भूमिका होती.भाजपावासी झालेल्या या अभिनेत्याचं नाव शेखर सुमन आहे. गेल्या आठवड्यात प्रदर्शित मंगळवारी भाजपाच्या मुख्यालयात विनोद तावडे आणि अनिल बलूनी यांच्यासह भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत शेखर सुमन यांनी पक्षात प्रवेश केला.

# माहेरी हेमा मालिनी तर सासरी जुही चावला

सिनेसृष्टीत एकमेकांचे नातेवाईक असलेले बरेच कलाकार आहेत. सुप्रसिद्ध अभिनेत्री मधू हीदेखील बॉलीवूडमधील दोन दिग्गज अभिनेत्रींची नातेवाईक आहे. मधू ही हेमा मालिनी व जुही चावला यांची नातेवाईक आहे. या दोघींची नातेवाईक असल्यामुळे करिअरमध्ये यश मिळत नाही, असं मत मधूने व्यक्त केलं आहे. हेमा मालिनी यांच्याशी असलेल्या नात्यामुळे खूप आदर मिळाला आणि काही गोष्टी अगदी सहज उपलब्ध झाल्या, असं मधूला वाटतं. लवकरच मधू 'कर्तम भुगतम' मध्ये दिसणार आहे. यानिमित्ताने दिलेल्या मुलाखतीत तिने हेमा मालिनी व जुही यांच्याबद्दल भाष्य केलं आहे.झूम एंटरटेनमेंट'ला दिलेल्या मुलाखतीत मधू म्हणाली, "मी हेमाजी यांची चुलत बहीण आहे आणि जुही माझ्या जाऊबाई आहेत. त्यांनी माझ्या पतीच्या चुलत भावाशी लग्न केलं आहे. आमचं कुटुंब कलाकारांचं कुटुंब आहे. पण, जुहीजी कुटुंबातील सदस्य म्हणून माझ्या आयुष्यात खूप नंतर आल्या. माझं लग्न आधी झालं होतं आणि लग्न झाल्यावर मी इंडस्ट्री सोडली होती. त्यामुळे त्यांचा कुटुंबात असण्याचा माझ्यावर भावनिक, मानसिक किंवा शारीरिक काहीही परिणाम झाला नाही."पुढे ती म्हणाली, "पण हेमाजींच्या कुटुंबातून आल्याचा माझ्यावर परिणाम झाला आणि तो चांगला होता. हेमाजींसारख्या दिग्गज अभिनेत्रीच्या कुटुंबातील व्यक्ती असल्याने मला खूप प्रतिष्ठा मिळाली." मुंबईत अनेक महत्त्वाकांक्षी तरुणी अभिनेत्री व्हायचं स्वप्न उराशी बाळगून येतात, पण त्यांना इथं कटू अनुभवांना सामोरं जावं लागतं.

# सॅमसनला बाद देण्याचा निर्णय वादग्रस्त!

## राजस्थान रॉयल्स पराभूत, प्लेऑफ प्रवेश लांबणीवर

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**दिल्ली कॅपिटल्सने राजस्थान रॉयल्सचा २० धावांनी पराभव करत मोठा विजय आपल्या नावे केला आहे. राजस्थानकडून संजू सॅमसनने ८६ धावांच्या खेळीसह संघाला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला, पण संजू झेलबाद झाल्याने सामना पुन्हा दिल्लीच्या बाजूने गेला. संजूला बाद देण्याचा निर्णय हा वादग्रस्त असल्याचे म्हटले जात आहे. संजूला शुभम दुबेनेही मोठे फटके खेळण्यात साथ दिली, पण तो फार काळ मैदानात टिकू शकला नाही. दिल्लीने दिलेल्या २२१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानचा संघ केवळ २०१ धावाच करू शकला आणि दिल्लीने २० धावांनी विजय नोंदवला.**



संजू सॅमसन मैदानात शेवटपर्यंत टिकून राहणं राजस्थानसाठी महत्त्वाचं होतं. मुकेश कुमारच्या १५व्या षटकातील पाचव्या चेंडूवर संजू मोठा फटका खेळायला गेला. पण सीमारेषेजवळ उभा असलेला शाई होपने त्याचा झेल टिपला. पण त्याचा पाय सीमारेषेला लागल्याचे राजस्थानचे मत होते. पण तरीही तिसऱ्या पंचांनी त्याला बाद दिले. त्याने पुन्हा रिव्ह्यू घेण्याचाही प्रयत्नही केला पण तोवर वेळ निघून गेली होती. संजूला अखेरीस ४६ चेंडूत ४ षटकार आणि ८ चौकारांसह ८६ धावा करत मैदानाबाहेर जावे लागले. संजू बाद झाला तेव्हा संघाला २६ चेंडूत ६० धावांची आवश्यकता होती. हे लक्ष्य गाठणे अवघड होतेच पण सोबतच संघाचे दोन महत्त्वाचे फलंदाज ध्रुव जुरेल आणि शेमरॉन हेटमायर आजच्या सामन्यासाठी उपलब्ध नव्हते, ज्याचा संघाला मोठा फटका बसला.दिल्लीने दिलेल्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानची सुरूवात चांगली झाली नाही. यशस्वी जयस्वाल ४ धावा तर बटलर १९ धावा करत बाद झाला. संजू सॅमसनने संघाचा डाव सावरत ८६ धावांची विस्फोटक खेळी केली, पण विजय मिळवून देऊ शकला नाही. तर रियान परागने २२ चेंडूत २७ धावांची खेळी केली पण मोठी खेळी करू शकला नाही. शुभम दुबे १२ चेंडूत २५ धावांची शानदार खेळी केली. पण संजू बाद झाल्यानंतरही तोही पॅव्हेलियनमध्ये परतला. तर फरेरिया, अश्विन स्वस्तात बाद झाले. पॉवेलने काही फटके खेळले पण मुकेश कुमारने त्याला अखेरच्या षटकात झेलबाद केले. दिल्लीकडून खलील अहमद, मुकेश कुमार आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या तर अक्षर पटेल आणि रसिख दर यांनी १-१ विकेट मिळाली. दिल्लीने नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजीला करताना २२१ धावांचा डोंगर उभारला. जेक फ्रेझरने नेहमीप्रमाणे झटपट सुरूवात केली. तर अभिषेक पोरेलने त्याला चांगली साथ दिली. जेकने २० चेंडूत ३ षटकार आणि ७ चौकारांसह ५० धावा केल्या. तर अभिषेक पोरेलने ३६ चेंडूत ३ षटकार आणि ७ चौकारांसह शानदार ६५ धावा केल्या. त्यानंतर ट्रिस्टन स्टब्सने २० चेंडूत ४१ धावा केल्या. तर गुलबदिननेही १९ धावांचे योगदान दिले. ज्यामुळे संघाची धावसंख्या २०० पार गेली. राजस्थानचे गोलंदाज आज चांगलेच महागात पडले. बोल्टने ४८ धावा देत १ विकेट, संदीप शर्माने ४२ धावा देत १ विकेट, चहलघेतली. संघासाठी अश्विन एकमेव गोलंदाज होता, ज्याने २४ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. दिल्ली कॅपिटल्सने राजस्थान रॉयल्सचा २० धावांनी पराभव करत मोठा विजय आपल्या नावे केला आहे. राजस्थानकडून संजू सॅमसनने ८६ धावांच्या खेळीसह संघाला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला, पण संजू झेलबाद झाल्याने सामना पुन्हा दिल्लीच्या बाजूने गेला. संजूला बाद देण्याचा निर्णय हा वादग्रस्त असल्याचे म्हटले जात आहे.

### दिल्लीने 20 धावांनी विजय नोंदवला

संजूला शुभम दुबेनेही मोठे फटके खेळण्यात साथ दिली, पण तो फार काळ मैदानात टिकू शकला नाही. दिल्लीने दिलेल्या २२१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानचा संघ केवळ २०१ धावाच करू शकला आणि दिल्लीने २० धावांनी विजय नोंदवला.दिल्ली कॅपिटल्सने राजस्थान रॉयल्सचा २० धावांनी पराभव करत मोठा विजय आपल्या नावे केला आहे. राजस्थानकडून संजू सॅमसनने ८६ धावांच्या खेळीसह संघाला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला, पण संजू झेलबाद झाल्याने सामना पुन्हा दिल्लीच्या बाजूने गेला. संजूला बाद देण्याचा निर्णय हा वादग्रस्त असल्याचे म्हटले जात आहे. संजूला शुभम दुबेनेही मोठे फटके खेळण्यात साथ दिली, पण तो फार काळ मैदानात टिकू शकला नाही.

# युवराज सिंगने रोहित शर्माचे खूपच कौतुक केले!

## रोहित शर्मा आणि युवराज सिंग या दोघांची घट्ट मैत्री

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा त्याच्या क्रिकेट कारकिर्दीतील नववा टी-२० विश्वचषक खेळणार आहे. रोहितच्या नेतृत्वाखालील संघाने ही आयसीसी ट्रॉफी आपल्या नावे करावी अशी प्रत्येकाची इच्छा आहे. त्याचप्रमाणे रोहितचा सर्वात जवळचा मित्र आणि माजी सहकारी असलेल्या युवराज सिंगलाही रोहितच्या हाती आयसीसी ट्रॉफी पाहायची आहे. युवराज सिंग यंदाच्या आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ चा ब्रँड ॲम्बेसेडर आहे.**




यादरम्यान युवराज सिंगने रोहितबद्दल बोलताना तो एक कर्णधार म्हणून भारतासाठी किती मोठी भूमिका बजावू शकतो आणि खेळाडू ते कर्णधारपद अशा यशस्वी प्रवासानंतरही रोहित कसा आहे, हे युवीने सांगितले. रोहित शर्मा आणि युवराज सिंग या दोघांची घट्ट मैत्री आहे. रोहित आणि युवराज हे २००७ च्या टी-२० वर्ल्डकपमधील सहकारी आहेत. तेव्हापासून ते आतापर्यंतच्या एवढ्या मोठ्या काळानंतरही या दोघांचं नातं अजूनही तितकंच घट्ट आहे. रोहित शर्माबद्दल बोलताना युवी म्हणाला, “मला खरंच रोहित शर्माला विश्वचषक ट्रॉफी आणि विश्वचषक पदकासह पाहायचे आहे आणि तो यासाठी पात्र आहे. ”पुढे सांगताना युवराज सिंग म्हणाला, टी-२० विश्वचषकासाठी रोहितची उपस्थिती खूप महत्त्वाची ठरणार आहे. माझ्या मते भारतीय संघाला खरोखर चांगला कर्णधार हवा आहे, एक समंजस कर्णधार जो दबावपूर्ण परिस्थितीतही चांगले निर्णय घेऊ शकतो आणि असे निर्णय घेणारा रोहित शर्माचं आहे. भारतीय संघ २०२३ च्या वनडे वर्ल्डकपच्या अंतिम सामन्यात पराभूत झाला तेव्हा तो कर्णधार होता. कर्णधार म्हणून त्याने पाच आयपीएल ट्रॉफी जिंकल्या आहेत. मला वाटते की भारताचा कर्णधार म्हणून आम्हाला त्याच्यासारखाच एखादा नेता हवा आहे.

### कोहलीशी जास्त बोलत नाही

”२००७ मध्ये भारतीय संघात पदार्पण करणाऱ्या रोहितचा प्रवास युवराजने जवळून पाहिला आहे. रोहितसोबतच्या पहिल्या भेटीच्या आठवणीबद्दल विचारले असता युवराज गमतीच्या स्वरात म्हणाला, ‘खूप वाईट इंग्रजी. खूप मजा मस्ती करणारा मुलगा.आतापर्यंत रोहितने खूप यश मिळवले आहे पण तरी माणूस म्हणून तो कधीही बदलला नाही. युवराजच्या रोहितवरील या वक्तव्याने रोहित आणि विराट कोहली या दोघांशीही त्याचे नाते किती वेगळे आहे हे समोर आले. युवराज रोहितचा खास मित्र असला तरी त्याचे कोहलीसोबतचे समीकरण थोडे वेगळे आहे. गेल्या वर्षी एका पॉडकास्ट दरम्यान, युवराजने खुलासा केला की विराट व्यस्त असल्यामुळे तो कोहलीशी जास्त बोलत नाही आणि आजचा विराट कोहली आणि पूर्वीचा कोहली यातील त्याने फरक सांगितला.